गुरूवार
०७
मे २०२६

वर्ष १९ वे
अंक - १०९
पाने - ६
किंमत - ४ रूपये

- Web : www.yuvavarta.in/com
- Mail : dailyyuvavarta@gmail.com

# दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

- RNI No. MAHMAR/2007/24252

पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25



# प्रशासनाने करुले गावचे पिण्याचे पाणी बंद केल्याने नागरिकांमध्ये संताप




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना दोन वर्षापासून बंद असून प्रशासनाला वेळोवेळी निवेदन देऊन सुद्धा पिण्याच्या पाण्याबाबत सरकारने अत्यंत दुर्लक्ष केले आहे. याचबरोबर जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी आडमुठे धोरण घेत पालकमंत्री व नवीन लोकप्रतिनिधी यांच्या दबावातून करूले गावची पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन जाणीवपूर्वक बंद केली असल्याने नागरिकांचे पिण्याच्या पाण्याचे मोठे हाल झाले आहे.

करुले गावचे सरपंच बाळासाहेब आहेर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, दोन वर्षापासून तळेगाव पाणीपुरवठा योजना बंद आहे. ही योजना सुरळीत व्हावी यासाठी प्रशासनाला वारंवार निवेदने दिली आहेत मात्र त्यावर कोणतीही कार्यवाही होत नाही. पाणीटंचाई असताना जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाणीपुरवठा योजनेचे कनेक्शन तोडून टाकले .यामुळे आम्हाला पाणी मिळत नाही. भर उन्हाळ्यामध्ये नागरिक पाण्यासाठी वनवन भटकत आहे. निळवंडे धरण व कालवे हे दुष्काळग्रस्त भागासाठी लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी निर्माण केले आहे. मात्र सध्याचे पालकमंत्री आणि नवीन लोकप्रतिनिधी हे पाण्याबाबत पूर्ण राजकारण करत आहेत. निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्यातून पाणी राहता तालुक्यातील बंधारे आणि नदी नाल्यांमध्ये सोडले जात आहे. मात्र संगमनेर तालुक्यातील जनतेला पिण्यासाठी सुद्धा पाणी मिळत नाही हे अत्यंत मोठी शोकांतिका आहे.

निळवंडेचा डावा कालवा आमच्या शिवारातून जात असून आम्हाला पाणी मिळत नाही. पिण्याच्या पाण्याची योजना बंद झाली आहे. जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी कनेक्शन तोडून पाणीपुरवठा बंद केल्याने पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत पालकमंत्री, नवीन लोकप्रतिनिधी ,शिर्डी विभागाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, यांच्यासह तहसीलदार ,प्रांताधिकारी, गटविकास अधिकारी यांना वेळोवेळी पत्र व्यवहार केला आहे. मात्र कोणाकडूनही प्रतिसाद मिळत नाही. पूर्णपणे राजकारण केले जात आहे.

जर पाणी मिळाले नाही, तर रास्ता रोको सह तीव्र आंदोलन उभारले जाईल पाण्यासाठी हा लढा असून याला संपूर्णपणे सध्याचे प्रशासन जबाबदार आहे. अधिकाऱ्यांवर दबाव आणून पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन जाणीवपूर्वक बंद केली आहे. तातडीने सुरू न केल्यास आत्मदहन करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# मोधळवाडी घाटात भीषण अपघात

## चुलती- पुतणीचा टेम्पोखाली चिरडून मृत्यू



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील पठारभागातील मोधळवाडी घाटात टेम्पो आणि दुचाकीच्या भीषण धडकेत दुचाकीवर प्रवास करणाऱ्या चुलती-पुतणीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (दि.५) सकाळी सुमारे ११.३० वाजेच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी टेम्पो चालकाविरोधात घारगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जया दत्तू थोरात (वय ३५) आणि अस्मिता दादा थोरात (वय १६, दोघी रा. मोधळवाडी, ता. संगमनेर) अशी मृतांची नावे आहेत. टेम्पो (क्र.एमएच.४२, बीएफ.९०९४) चालकाने रस्त्यावरील परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगात वाहन चालवत दुचाकीला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडल्याचे समोर आले आहे. या धडकेत दोघींना गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले व पोलिसांना माहिती दिली. जखमी अवस्थेत दोघींना घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच घारगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात व पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ गांधले यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

याबाबत जया थोरात यांचे पती दत्तू बबन थोरात यांनी फिर्याद दिली आहे. त्यावरुन वरील टेम्पो चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दुर्दैवी घटनेमुळे पिंपळगाव देपा व मोधळवाडी परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

# हिवरगाव पावसा टोलनाक्यावर कारवाई

# ६९.७९ लाखांचा गुटखा जप्त




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गावर संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा टोलनाक्याजवळ मंगळवारी (दि. ५) सकाळी सुमारे ११.३० वाजण्याच्या सुमारास पोलिस व अन्न व औषध प्रशासनाने संयुक्तरित्या धडक कारवाई करत अवैधरित्या वाहतूक होत असलेला लाखो रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला. या कारवाईमुळे गुटखा तस्करीविरोधात प्रशासनाने पुन्हा एकदा कडक भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

अहिल्यानगर येथील स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त माहिती मिळाली होती की, नाशिकहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या एका टेम्पोमधून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित गुटख्याची तस्करी केली जात आहे. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखा आणि अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी हिवरगाव पावसा टोलनाका परिसरात सापळा रचला.

संशयास्पद टेम्पो अडवून त्याची कसून तपासणी करण्यात आली असता, वाहनात गोण्यांमध्ये भरून ठेवलेला सुगंधी तंबाखू व गुटखा मोठ्या प्रमाणावर आढळून आला. या साठ्याची किंमत लाखोंमध्ये असल्याचे निष्पन्न झाले. कारवाईदरम्यान टेम्पोतील तिघा संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून, ते राजस्थान व उत्तर प्रदेश येथील रहिवासी असल्याची माहिती प्राथमिक तपासात समोर आली आहे.

या कारवाईत गुटखा, चारचाकी वाहन, मोबाईल आदींसह एकूण ६९ लाख ७९ हजार ४७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. संबंधितांविरुद्ध संगमनेर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील तपास सुरू आहे.

अन्न व औषध प्रशासन विभागाचे अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप पवार यांनी सांगितले की, राज्यात प्रतिबंधित असलेल्या गुटख्याची तस्करी रोखण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया सातत्याने केल्या जात असून, संबंधितांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

दरम्यान, या घटनेमुळे पुन्हा एकदा राष्ट्रीय महामार्गावरून सुरू असलेल्या गुटखा तस्करीचे जाळे उघड झाले असून, अशा अवैध व्यवसायांविरोधात प्रशासनाने आणखी कठोर पावले उचलण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# चणेगावात स्मशानभूमीत बेकायदेशीर वाळू उत्खननाचा आरोप

## ग्रामस्थांचा संताप, कारवाईची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- तालुक्यातील चणेगाव येथे वाळू उत्खननासाठी टेंडर प्रक्रिया सुरू असतानाच संबंधित ठेकेदाराने अधिकृत परवानगी मिळण्यापूर्वीच थेट स्मशानभूमीत उत्खनन केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले असून धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रशासनाने गट क्रमांक ३ ते ५ व १७ ते १९ या क्षेत्रासाठी वाळू उत्खननाची अधिसूचना जाहीर केली आहे. मात्र, संबंधित ठेकेदाराने कोणतीही अधिकृत परवानगी किंवा ताबा न घेता १ मे रोजी सायंकाळी गट क्रमांक १ मधील स्मशानभूमीत पोकलेन मशीनच्या साह्याने उत्खनन सुरू केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यावेळी स्मशानभूमीतून थेट रस्ता तयार करण्यात आला असून नदीपात्रात मुरूम टाकून रॅम्प उभारण्यात आल्याचेही स्थानिकांनी सांगितले. या उत्खननादरम्यान दफन केलेल्या पूर्वजांचे अवशेष वर आल्याचा धक्कादायक दावा ग्रामस्थांनी केला आहे. काही अवशेष पुन्हा अन्यत्र दाबून टाकल्याचीही चर्चा असून, या प्रकारामुळे धार्मिक स्थळाचा अपमान तर झालाच, पण मानवी संवेदनांनाही धक्का बसल्याची भावना व्यक्त होत आहे.

विशेषतः आदिवासी व दलित समाजातील नागरिकांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदवला आहे. या प्रकरणाच्या निषेधार्थ ४ मे रोजी ग्रामस्थांनी तहसीलदार, प्रांत अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी), स्थानिक पोलीस निरीक्षक व जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले. संबंधित ठेकेदारावर भारतीय दंड संहितेतील कलम २९५ व २९७ तसेच इतर लागू कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. एका शेतकऱ्याने बैलगाडीतून वाळू वाहतूक केली तर तात्काळ कारवाई होते, मात्र इतक्या मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर उत्खनन होऊनही संबंधितांवर कारवाई का होत नाही? असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

दरम्यान संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची दखल घेत कारवाईचे आश्वासन दिले असले, तरी प्रत्यक्षात कोणतीही ठोस हालचाल दिसून आलेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढत आहे. वेळेत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. गावातील सामाजिक सलोखा व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून सखोल चौकशी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. या प्रकरणात पुढे काय कारवाई होते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# सिंहस्थनिमित्त नाशिकमध्ये ११ हजार कोटींची गुंतवणूक



मुंबई (वृत्तसंस्था)

जिल्हा विकास अन् उद्योगवाढीसाठी गुंतवणुकीवर अधिक लक्ष केंद्रित करणाऱ्या उद्योग विभागाने आता सिंहस्थाच्या निमित्ताने नाशिकमध्ये तब्बल ११,००० कोटींची गुंतवणूक आणली आहे. त्यासाठी आयोजित 'कुंभ उद्योग संगम' आणि 'नाशिक डिस्ट्रिक्ट इन्व्हेस्टमेंट समिट'मध्ये तब्बल २९४ सामंजस्य करार आज ( ६ मे) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणार आहेत.

यातून आगामी ५ वर्षांत विविध क्षेत्रांमध्ये एकूण ३५ हजार रोजगार निर्माण होणार आहेत. सिंहस्थ प्राधिकरण, जिल्हा प्रशासन, उद्योग विभागाने हे उद्योग कायमस्वरूपी नाशिकमध्ये स्थिर व्हावेत, यासाठी या उपक्रमाचे आयोजन व प्रक्रियेची तयारी केली आहे.

आजच्या समिटमध्ये २९४ सामंजस्य करार करण्याची तयारी आहे. यापूर्वीही नाशिकमध्ये १८,००० कोटींची गुंतवणूक आली आहे. त्यातील कंपन्या जमिनी घेणे, बांधकामे सुरू करणे व विविध परवानग्या घेण्याच्या स्तरावर आहेत. याचे दृश्य परिणाम खऱ्या अर्थाने पुढील ३ ते ५ वर्षांत दिसून येतील. - दीपेंद्रसिंह कुशवाह, उद्योग विकास आयुक्त, महाराष्ट्र राज्य.महिंद्रा करणार १२ हजार रोजगारांची निर्मिती

नाशिकमध्ये आधीच महिंद्राची मोठी गुंतवणूक आहेच; परंतु आता ईव्ही कारचाही प्लँट नाशिकमध्येच सुरू करण्यासाठी आडवण येथे ५,००० कोटींची गुंतवणूक केली जाणार आहे. तसेच लॉजिस्टिक सपोर्टही सुरू केला जाईल. या दोन्हींमधून १० ते १२ हजार रोजगार निर्माण होतील.

संरक्षण क्षेत्रात चार हजार कोटींच्या गुंतवणुकीसाठी बेर्निको वेगार्ड या जर्मन कंपनीशी कराराचे प्रयत्न

संरक्षण साहित्य उत्पादनात कार्यरत बेर्निको वेगार्ड या जर्मन कंपनीकडूनही नाशिकमध्ये पहिल्या टप्प्यात १ हजार आणि टप्प्याटप्प्याने ३ हजार कोटींच्या गुंतवणुकीसाठी गेली काही दिवस चाचपणी सुरू आहे. मंगळवारी सायंकाळपर्यंत सामंजस्य करार करण्यासंदर्भात या कंपनी व प्रशासनाची चर्चा सुरू होती. नाशिकचे मुंबई आणि वाढवण बंदर यांच्यासोबत असलेले कमी अंतर, उत्तम हवामान, कुशल मनुष्यबळ, डिफेन्स हबमध्ये नाशिकचा समावेश यामुळे कंपनी ही गुंतवणूक करण्यास उत्सुक आहे.

# डॉ. अमोल सानप वाढदिवस शुभेच्छा



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर- संगमनेर तालुक्यातील प्रथितयश डॉक्टर म्हणून ओळख असलेले डॉ. अमोल सानप (एम.एस.,अर्थातज्ञ) यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट सेवा देत असताना त्यांनी रुग्णसेवेबरोबरच सामाजिक बांधिलकी जपल्यामुळे त्यांना तालुक्यात विशेष मान आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सुनिल भाऊ उकिर्डे व मित्र परिवार, निळवंडे यांच्या वतीने डॉ. सानप यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

# अश्विनी चकोर यांची मृदा व जलसंधारण विभागात अधिकारीपदी निवड



संगमनेर (प्रतिनिधी) - राजहंस दूध संघाचे चेअरमन राजेंद्र पाटील चकोर यांची कन्या कु. अश्विनी राजेंद्र चकोर यांची महाराष्ट्र शासनाच्या मृदा व जलसंधारण विभागात अधिकारी पदावर निवड झाल्याने संगमनेर तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल खळी व पंचक्रोशी परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कु. अश्विनी चकोर यांनी आपल्या चिकाटी, परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर हे यश संपादन केले आहे. स्पर्धा परीक्षेच्या कठीण प्रवासातून त्यांनी हे यश मिळवत तरुणांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या निवडीमुळे कुटुंबासह संपूर्ण परिसराचा मान उंचावला आहे. त्यांच्या यशाबद्दल ग्रामस्थ, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. पुढील वाटचालीसाठी दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने शुभेच्छा..

# लैंगिक अत्याचाराच्या आरोपींचा 'पॅरोल' कायमचा बंद होणार - मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई (वृत्तसंस्था)

पुणे जिल्ह्यातील नसरापूर इथल्या चिमुकलीवर झालेल्या अमानवीय अत्याचार आणि हत्या प्रकरणामुळे महाराष्ट्र संतप्त झाला आहे. या घटनेचे तीव्र पडसाद मंत्रालयात झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत उमटले. पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आणि अशा गुन्हेगारांवर लगाम घालण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला असून, लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल न देण्याबाबत नवीन कायदा करण्याचे आदेश विधी व न्याय विभागाला दिले आहेत.मंत्रिमंडळ बैठकीत बोलताना मुख्यमंत्र्यांनी एक धक्कादायक निरीक्षण नोंदवले. ते म्हणाले की, लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांतील ८० ते ९० टक्के आरोपी हे आधीच त्याच गुन्ह्याखाली जेलमध्ये असतात, मात्र पॅरोलवर बाहेर आल्यावर ते पुन्हा तशाच प्रकारचे कृत्य करतात. या गुन्हेगारांची ही साखळी तोडण्यासाठी २०१४ ते २०१९ या काळात राज्य सरकारने असा कठोर कायदा केला होता, जो पुढे न्यायालयाने रद्दबातल ठरवला होता. आता पुन्हा तसाच प्रभावी कायदा तयार करा, जेणेकरून नराधमांना कायद्याची कोणतीही पळवाट मिळणार नाही, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

नराधमाला भरचौकात फाशी द्यावी वाटते, पण...नसरापूर घटनेतील संतापावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भावूक झाले. एका बापाच्या नात्याने आणि राज्याचा मुख्यमंत्री म्हणून मलाही वाटते की अशा नराधमाला भरचौकात फाशी द्यावी, पण लोकशाहीत आपल्याला कायद्याच्या चौकटीत राहूनच कारवाई करावी लागते, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. पीडितेच्या वडिलांशी स्वतः दोनदा संवाद साधल्याचे सांगत त्यांनी खात्री दिली की, या नराधमाला मृत्यूदंडाचीच शिक्षा व्हावी यासाठी सरकार पूर्ण ताकद लावेल. फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवणारया प्रकरणातील तपासाबाबत मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाच्या माध्यमातून हा खटला फास्ट ट्रॅकवर नेला जाईल. तसेच वेळेत चार्जशीट दाखल करून आरोपीला कोणतीही संधी दिली जाणार नाही. यासोबत कायद्याचा कोणताही दुरुपयोग होऊ नये यासाठी विशेष खबरदारी घेतली जाणार आहे.

# भोंदू खरात पुन्हा पाच दिवसांच्या कोठडीत



युवावार्ता (प्रतिनिधी)

येथील चार एकर जमीन खरेदीतील फसवणूक व सावकारकीचे आरोप असलेल्या भोंदू अशोक खरात यास राहाता न्यायालयाने पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. या प्रकरणात खरात मुख्य आरोपी आहे. त्याची पत्नी कल्पना फरार आहे. तीचा अटकपूर्व जामीन अर्ज राहाता न्यायालयाने यापूर्वीच फेटाळला आहे तर अटकेत असलेले दोन्ही आरोपी अरविंद बावके आणि किरण सोनावणे यांचे जामीन अर्ज देखील न्यायालयाने फेटाळले आहेत.

दरम्यान, नाशिक पोलिसांच्या ताब्यात असलेला आरोपी भोंदू खरात यास काल शिर्डी पोलिसांनी ताब्यात घेतले. काल सायंकाळी सातच्या सुमारास त्यास शिर्डी पोलिस ठाण्यात आणण्यात आले. वैद्यकीय तपासणी करून त्यास न्यायालयापुढे उभे करण्यात आले असता त्याला पाच दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली.

शिर्डी येथील शेतकरी रावसाहेब नाना गोंदकर यांची चार एकर जमीन तीन वर्षांपूर्वी भोंदू खरातने खरेदी केली होती. मात्र, त्याच्याकडून तीन कोटी रुपये कर्ज आम्ही घेतले होते. त्यापोटी ही जमीन खरेदी करून घेतली. शिवाय व्याज देखील घेतले. आम्ही पैसे परत करायला तयार असताना जमीन परत केली नाही, अशी तक्रार गोंदकर यांनी शिर्डी पोलिस ठाण्यात दाखल केली होती. या प्रकरणाचा तपास पोलिस करीत आहेत.












# हिंदुत्वाची ठाम भूमिका, विकासाची अखंड धडपड

संगमनेर मतदारसंघाच्या राजकारणात गेल्या काही काळात एक वेगळी कार्यशैली ठळकपणे समोर आली आहे-विचारांमध्ये ठाम हिंदुत्व आणि कामांमध्ये वेगवान विकास. या दोन्हीचा समतोल साधत अल्पावधीत जनतेच्या मनात विश्वास निर्माण करणारे नेतृत्व म्हणजे आमदार अमोलभाऊ खताळ पाटील. राजकारणात अनेकदा आश्वासने दिली जातात, पण त्यांची पूर्तता क्वचितच दिसून येते. मात्र अमोलभाऊंनी आपल्या दीड वर्षांच्या कार्यकाळात बोलण्यापेक्षा करण्यावर भर देत विकासकामांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाची ओळख केवळ राजकीय भाषणांपुरती मर्यादित न राहता, ठोस कामांच्या आधारे निर्माण झाली आहे.

संगमनेर परिसर हा दुष्काळग्रस्त म्हणून ओळखला जातो. पाणी ही येथील सर्वात मोठी समस्या. ही अडचण लक्षात घेऊन आमदार खताळ यांनी जलसंपदा विभागाशी सातत्याने पाठपुरावा करत विविध सिंचन योजनांना गती देण्याचे काम केले. विशेषतः राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या माध्यमातून भोजपुरचारी आणि साकुर पठार जलसिंचन उपसा योजना यांसारख्या प्रकल्पांना चालना मिळाली. या योजनांमुळे शेतकऱ्यांना पाण्याची उपलब्धता वाढून शेती अधिक सक्षम होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. ग्रामीण विकासाच्या बाबतीतही आमदार खताळ यांनी विशेष लक्ष केंद्रित केले. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्याने विविध विकास योजनांसाठी निधी उपलब्ध करून घेतला. या निधीतून गावागावांत रस्ते सुधारणा, पाणीपुरवठा योजना, सार्वजनिक सुविधा आणि पायाभूत विकासकामांना गती मिळाली. ग्रामीण भागात विकासाची चाके फिरू लागली, हेच त्यांच्या कामाचे मोठे यश मानले जाते.

हिंदुत्ववादी विचारसरणीवर ठाम असलेल्या आमदार खताळ यांनी धार्मिक स्थळांच्या विकासालाही प्राधान्य दिले. मंदिर परिसरांचे सुशोभीकरण, भक्तांसाठी सुविधा, तसेच धार्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी विविध योजनांतून निधी उपलब्ध करून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. या कामांमुळे केवळ श्रद्धास्थानांचा विकास झाला नाही, तर स्थानिक अर्थव्यवस्थेलाही बळ मिळाले आहे. औद्योगिक विकासाशिवाय रोजगारनिर्मिती शक्य नाही, ही जाणीव ठेवून आमदार खताळ यांनी एम.आय.डी.सी. प्रकल्पासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. औद्योगिक क्षेत्र उभे राहिल्यास स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, लघुउद्योगांना चालना मिळेल आणि मतदारसंघाचा आर्थिक विकास वेगाने होईल-हा त्यामागील दूरदृष्टीचा भाग आहे. पर्यटनाच्या दृष्टीनेही त्यांनी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. संगमनेरमधील ऐतिहासिक वारसा असलेला



पेमगिरी (शहागड) किल्ला हा मतदारसंघाचा अभिमान आहे. या किल्ल्याचे संवर्धन, सुशोभीकरण आणि पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्यासाठी आमदार खताळ यांनी विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. पर्यटन सुविधा निर्माण करून या ठिकाणाला राज्याच्या पर्यटन नकाशावर स्थान मिळवून देण्याचा त्यांचा मानस आहे.

शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत क्षेत्रांनाही त्यांनी प्राधान्य दिले आहे. शैक्षणिक सुविधा सुधारण्यासाठी तसेच ग्रामीण भागात आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यासाठी विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होण्यास मदत होत आहे. आमदार अमोलभाऊ खताळ यांच्या कार्याचा पंचसूत्री आधार स्पष्टपणे दिसून येतो. शेती व जलसिंचन विकास, पर्यटन आणि ऐतिहासिक वारसा जतन, शिक्षण सुविधा उभारणी, युवकांसाठी रोजगार निर्मिती आणि ग्रामीण आरोग्य व्यवस्था सक्षम करणे, या बाबींवर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. राजकारणात आरोप-प्रत्यारोप अपरिहार्य असतात. मात्र अमोलभाऊंनी या वादांमध्ये अडकून न पडता कामातून उत्तर देण्याची भूमिका घेतली. त्यांच्या कार्यपद्धतीतून विकासाला प्राधान्य देणारा दृष्टिकोन स्पष्टपणे जाणवतो. त्यामुळेच विरोधकांनाही त्यांच्या कामाची दखल घ्यावी लागत आहे.

अल्पावधीत त्यांनी हिंदुत्ववादी विचार आणि विकासात्मक कामांचा समतोल साधत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कामाची दखल केवळ मतदारसंघापुरती मर्यादित न राहता राज्य पातळीवरही घेतली जात आहे. शिवसेना नेतृत्वात, विशेषतः एकनाथ शिंदे यांच्या विश्वासातील नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण होत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.


आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त, त्यांच्या या कार्याचा आढावा घेताना एक गोष्ट निश्चितपणे जाणवते- हे नेतृत्व केवळ राजकारणासाठी नाही, तर समाजकारण आणि विकासासाठी झटणारे आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर मतदारसंघ अधिक प्रगत, सक्षम आणि समृद्ध होवो, हीच अपेक्षा. वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा, आमदार अमोलभाऊ खताळ!



**– आशिष तानाजी कानवडे**
(संस्थापक - धर्मनाद प्रतिष्ठान)

## ११ वी कॉमर्समध्ये विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी

# फिनिक्स एज्युकेशन इन्स्टिट्यूटचा दणदणीत यशाचा झेंडा




संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
यंदाच्या शैक्षणिक वर्षातील निकालात फिनिक्स एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा उज्ज्वल यश संपादन करत संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा कायम राखली आहे. या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून संस्था, विद्यार्थी आणि पालक यांच्यासाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण ठरला आहे.

इयत्ता ११वी (कॉमर्स) च्या निकालात श्रमिक ज्युनियर कॉलेजमध्ये इंग्रजी माध्यमातून संस्थेच्या विद्यार्थ्यांनी विशेष कामगिरी केली. कपिल काऊटे यांनी ९३.६७% गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. त्याचप्रमाणे तनिष्का केदारी हिने ९३.१७% गुण मिळवत द्वितीय, विधी चोपडा हिने ९२.८३% गुणांसह तृतीय, तर आदित्य ढोले याने ९२.०५% गुणांसह चतुर्थ क्रमांक मिळवला. कार्तिक घुले याने ९१.६७% गुणांसह पाचवा क्रमांक मिळवत आपली छाप पाडली. तसेच मराठी माध्यमातूनही संस्थेच्या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक मिळवत यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

विशेष म्हणजे अकाऊंटन्सी विषयात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश मिळवले असून ३ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. यामध्ये एका विद्यार्थ्याने १०० पैकी १०० गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. याशिवाय १३ विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा अधिक आणि १० विद्यार्थ्यांनी ७०% पेक्षा अधिक गुण मिळवत चांगली कामगिरी नोंदवली.

हा निकाल केवळ आकड्यांचा नसून विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, योग्य मार्गदर्शन आणि मजबूत शैक्षणिक पाया याचे प्रतिक असल्याचे संस्थेचे संचालक कृष्णा आसावा यांनी सांगितले. विद्यार्थ्यांचा पाया मजबूत करणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच आजचे यश शक्य झाले असून भविष्यातही यशाची ही परंपरा अधिक मोठ्या प्रमाणात कायम राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, फिनिक्स एज्युकेशन इन्स्टिट्यूटने आता इयत्ता ५वी ते १०वी (डडउ, उइडए तसेच उरालीळवसश इेरीव) विद्यार्थ्यांसाठीही नवीन वर्ग सुरू केले असून लहान वयापासूनच विद्यार्थ्यांचा भक्कम पाया घडवण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. संस्थेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# स्वगणनेत नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा - सभापती प्रा. राम शिंदे

## सभापतींकडून स्वगणना करून जनतेस आवाहन



अहिल्यानगर
(जिल्हा माहिती कार्यालय)-
देशाच्या १६ व्या राष्ट्रीय जनगणनेला डिजिटल स्वरूपात प्रारंभ झाला असून, नागरिकांच्या सक्रिय सहभागातून ही प्रक्रिया अधिक सक्षम होणार आहे. प्रत्येक नागरिकाने स्वगणना प्रक्रियेत सहभागी होऊन देशाच्या विकासात आपले योगदान द्यावे, असे आवाहन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.

सभापती प्रा. राम शिंदे यांनी चौंडी येथे स्वगणना करून जनगणना प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी टॅबच्या माध्यमातून स्वतःच्या घरगणनेशी संबंधित सर्व माहिती भरल्यानंतर त्यांचा 'सेल्फ एन्युमरेशन आयडी' तयार झाला. या प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेत त्यांनी नागरिकांना स्वगणना करण्याचे आवाहन केले, व ही पद्धत सोपी, सुरक्षित व वेळ वाचवणारी आहे. दि. १ ते १५ मे या कालावधीत नागरिकांना स्वगणनेची सुविधा उपलब्ध असून, त्यानंतर दि. १६ मे ते १४ जून दरम्यान प्रगणकांकडून घरोघरी जाऊन जनगणना करण्यात येणार आहे.

जनगणनेच्या या उपक्रमामुळे अचूक व अद्ययावत माहिती संकलित होऊन शासनाच्या विविध योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होणार आहे. डिजिटल जनगणनेमुळे प्रक्रिया सुलभ, जलद व पारदर्शक होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

जाणकार नागरिक - सक्षम राष्ट्र, ही भावना जपत प्रत्येकाने या ऐतिहासिक उपक्रमाचा भाग व्हावे. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वगणना ही महत्त्वाची पायरी असून, सर्वांनी जबाबदारीने सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रा. राम शिंदे यांनी केले.

# विद्यार्थ्यांच्या अविरत मेहनतीतून सह्याद्रीची यशोगाथा, बारावी निकालात घवघवीत यश





संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर होताच सह्याद्री ज्युनिअर कॉलेजने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली. विज्ञान शाखेत सार्थक बिबवे, तर कला शाखेत शुभांगी गौतम यांनी तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच भौतिकशास्त्र आणि गणित विषयात राज्यस्तरावर अव्वल यश संपादन करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. यानिमित्त आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य खेमनर एस. एम. होते. त्यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या वर्षभरातील उपक्रमांचा आणि बारावीच्या उज्ज्वल निकालाचा आढावा घेतला. प्रमुख पाहुणे डॉ. सुधीर तांबे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, यश हे योगायोगाने मिळत नाही. सातत्यपूर्ण परिश्रम, अभ्यासातील शिस्त आणि मानसिक स्थैर्य यांच्या जोरावरच टिकाऊ यश मिळते. विद्यार्थ्यांनी दीर्घकालीन ध्येय डोळ्यासमोर ठेवून सातत्य राखावे, असे आवाहन त्यांनी केले.

माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे यांनी संस्थेच्या कार्यपद्धतीचे कौतुक करताना सांगितले की, सहकारमहर्षी स्व. भाऊसाहेब थोरात यांनी स्थापन केलेल्या संस्थेने गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा जपली आहे. शिक्षकांसाठी राबविण्यात येणारे प्रशिक्षण उपक्रम संस्थेच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

संस्थेचे संचालक बाबा खरात यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे श्रेय पालकांचे पाठबळ, शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांच्या चिकाटीला दिले. 'डायमंड बॅच' उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत लक्षणीय वाढ झाल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तालुक्यात प्रथम आलेल्या सार्थक बिबवे याने नियमित अभ्यास, वेळेचे नियोजन आणि सातत्यपूर्ण चाचण्या हे यशाचे प्रमुख सूत्र असल्याचे सांगितले. शुभांगी गौतम हिने आत्मविश्वास, सातत्य आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळे हे यश मिळाल्याचे नमूद केले.

उल्लेखनीय कामगिरी. भौतिकशास्त्र विषयात सार्थक बिबवे राज्यात प्रथम, गणित विषयात सार्थक बिबवे व तेजस अभंग यांचे राज्यस्तरीय अव्वल यश, तसेच विविध विषयांत ९० पेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १३० पेक्षा अधिक आहे. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. पालक आणि विद्यार्थ्यांनीही संस्थेच्या कार्यपद्धतीबद्दल समाधान व्यक्त केले.

समारंभास प्रशासन अधिकारी चेतन मुर्तडक, उपप्राचार्य संजय सुरसे, पर्यवेक्षक भास्कर कुंटे, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. गणेश गुंजाळ व प्रा. नवनाथ गुंड यांनी केले. आभार उपप्राचार्य प्रा. एस. पी. सुरसे यांनी मानले.

# शिल्पकलेचा वारसा पाहून इतिहासप्रेमी मंत्रमुग्ध

## अकोलकर- संगमनेरकर अभ्यास मंडळाचा उपक्रम




अकोले
(युवावार्ता प्रतिनिधी) -
अकोले तालुक्यातील टाहाकारी येथील मध्ययुगीन जगदंबा मंदिर शिल्पकलेचा वारसा इतका समृद्ध आहे की तो पाहून इतिहासप्रेमी अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. अकोलकर- संगमनेरकर अभ्यास मंडळाने रविवारी (दि. ३) 'हेरिटेज वॉक' (वारसा स्थळांना भेट) चे येथे आयोजन केले होते. इतिहास अभ्यासक प्रा. विठ्ठल शेवाळे हे या अनोख्या उपक्रमाचे आयोजक आहेत. संकल्प प्रमुख, संयोजक रमेश थोरात असून, संगमनेर येथील जिजामाता इंग्लिश मीडिअम स्कूल आणि सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात महाविद्यालयाचे या उपक्रमास सहकार्य लाभले आहे. अकोलकर- संगमनेरकर अभ्यास मंडळाच्या वतीने महिन्याच्या पहिल्या रविवारी संगमनेर किंवा अकोले तालुक्यातील एखाद्या वारसा स्थळाला भेट देऊन माहिती घेतली जाते. मागील महिन्यात संगमनेर येथील सरदार अंभोरकर- देशमुख वाड्याची भेट होती. स्थानिक इतिहासाचे महत्त्व जाणून लोकांना इतिहासाचा परिचय करून देणे, पुढच्या पिढीत इतिहास रुजवणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

वारसा स्थळांना भेट हा उपक्रम दोन्ही तालुक्यातील इतिहासप्रेमींसाठी पर्वणी ठरत आहे. टाहाकारी येथे झालेल्या 'हेरिटेज वॉक'ला खूप चांगला प्रतिसाद मिळाला. संगमनेरमधून तीस, तर अकोल्यामधून वीस, असे एकूण पन्नास लोक उपक्रमात सहभागी झाले होते.

इतिहास अभ्यासक प्रा. विठ्ठल शेवाळे आणि जगदंबा मंदिर अभ्यासक डॉ. उल्हास कुलकर्णी यांनी मंदिराबद्दल माहिती देताना सांगितले की, चालुक्य कालखंडातील या मंदिराची रचना तारकाकृती, म्हणजे बहुकोनी असून, भूमिज लतिन शुष्कसंधी या प्रकाराचे आहे. मुखमंडप, मंडप, अंतराळ, गर्भगृह अशी मंदिराची रचना, वितान म्हणजे छत, देवकोष्ठे व त्यातील शिल्पे, मातृका, कामशिल्पे, शिखर, कीर्तीमुख, त्याचप्रमाणे बाह्यभिंतीवरील आपल्या आयुष्यातील घडणाऱ्या घटनांवर भाष्य करणारे प्रतीक, म्हणजे सुरसुंदरी, त्या शिल्पांची ऊन-सावल्यांचा खेळ दिसणारी शैली, यांसारख्या अनेक सामान्य माणसाला न समजणाऱ्या गोष्टी डॉ. कुलकर्णी व प्रा. शेवाळे या दोघांनी सहज, सोप्या भाषेत समजून सांगितल्या.

बाह्यभिंतीवरील कामशिल्पे, अथवा मैथुन शिल्पे आणि मुख्य मंडप आतील भितीवरील 'मातृका' यांचे शिल्पांबाबत स्पष्टीकरण करताना ते म्हणाले की, देवीच्या दर्शनाला येताना आपल्यातील विकार नष्ट व्हावेत, मन निर्विकार व्हावे, असे या शिल्पांतून सूचकपणे काही गोष्टी सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. यावेळी जगदंबा मंदिर ट्रस्टच्या वतीने अध्यक्ष अण्णासाहेब एखंडे व विश्वस्त भाऊसाहेब एखंडे यांनी उपस्थितांना अल्पोपहार देऊन आभार मानले.

# संपादकीय...

**जयंतीनिमित्त**

## दोन राष्ट्रगीतांचे जनक गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

आज ७ मे, भारतभूमीच्या सांस्कृतिक आणि वैचारिक परंपरेला जागतिक स्तरावर मानाचे स्थान मिळवून देणारे महान कवी, तत्त्वज्ञ, साहित्यिक आणि मानवतावादी विचारवंत गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची जयंती. ७ मे १८६१ रोजी कोलकाता येथील जोर-सांको येथे जन्मलेल्या टागोरांनी आपल्या बहुआयामी प्रतिभेने केवळ भारतीय साहित्य समृद्ध केले नाही, तर संपूर्ण जगाला भारतीय संस्कृतीचे वैभव दाखवून दिले. त्यांच्या आई शारदादेवी आणि वडील महर्षी देवेंद्रनाथ टागोर यांच्या संस्कारातून त्यांना आध्यात्मिक व बौद्धिक वारसा लाभला. औपचारिक शिक्षणापेक्षा स्वतंत्र विचारसरणीला प्राधान्य देत त्यांनी घरच्या घरी विविध विषयांचा अभ्यास केला आणि लहान वयातच साहित्यनिर्मितीला प्रारंभ केला. वयाच्या आठव्या वर्षी कविता लिहिण्याची सुरुवात करणाऱ्या या प्रतिभावंताने 'भानुसिंह' या टोपणनावाने तरुण वयातच उल्लेखनीय काव्यनिर्मिती केली. इंग्लंडमध्ये उच्च शिक्षणासाठी गेले असले तरी पदवी न घेता भारतात परत येत त्यांनी सर्जनशीलतेच्या माध्यमातून स्वतःचा वेगळा मार्ग निवडला. १९१३ साली 'गीतांजली' या काव्यसंग्रहासाठी मिळालेला नोबेल पुरस्कार हा केवळ त्यांच्या वैयक्तिक यशाचा नव्हे, तर भारतीय साहित्याच्या जागतिक मान्यतेचा टप्पा ठरला. स्वीडिश अकादमीकडून सन्मानित होणारे ते पहिले आशियाई ठरले आणि त्यामुळे भारताचे नाव जगभर पोहोचले. १९१५ साली ब्रिटिश सरकारने दिलेली 'सर' ही पदवी त्यांनी स्वीकारली, मात्र १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर ती परत करून त्यांनी आपल्या राष्ट्रप्रेमाची ठाम भूमिका जगासमोर मांडली. टागोरांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या विचारांची व्यापकता आणि मानवतावादी दृष्टीकोन. त्यांनी रचलेले 'जन गण मन' आणि 'आमार शोनार बांग्ला' ही अनुक्रमे भारत आणि बांगलादेशची राष्ट्रगीते आहेत, ही बाब त्यांच्या काव्यप्रतिभेची सर्वोच्च साक्ष ठरते. जगात दोन राष्ट्रगीतांचे जनक म्हणून ओळखले जाणारे ते एकमेव कवी आहेत, ही त्यांची अद्वितीय ओळख आहे. शिक्षणव्यवस्थेबाबत त्यांचा दृष्टिकोनही अत्यंत प्रगत होता. पारंपरिक शिक्षणपद्धती विद्यार्थ्यांना केवळ पाठांतर शिकवते, या विचारातून त्यांनी शांतिनिकेतनची स्थापना केली आणि शिक्षणाला सर्जनशीलतेची जोड देणारा नवा आदर्श निर्माण केला. त्यांच्या या प्रयोगामुळे शिक्षण क्षेत्रात एक क्रांतिकारक बदल घडून आला. साहित्य, संगीत, नाटक, चित्रकला अशा विविध क्षेत्रांत त्यांनी केलेली निर्मिती आजही प्रेरणादायी ठरते. 'रवींद्रसंगीत' ही त्यांची खास शैली भारतीय संगीतातील एक महत्त्वाचा अध्याय आहे. त्यांच्या लेखनातून मानवी भावभावनांचे सूक्ष्म चित्रण, सामाजिक जाण आणि राष्ट्रीय भावना यांचा संगम दिसून येतो. महाराष्ट्रासारख्या सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध प्रदेशाचा प्रभावही त्यांच्या विचारांवर पडला होता. संत तुकारामांच्या अभंगांचा त्यांनी अभ्यास करून त्यांचे बंगाली भाषेत भाषांतर केले, तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित खंडकाव्य रचून त्यांनी भारतीय इतिहासाबद्दलची आपली आदरभावना व्यक्त केली. त्यामुळे त्यांच्या साहित्याला केवळ प्रादेशिक मर्यादा न राहता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिमाण प्राप्त झाले. त्यांच्या कार्यामुळे बंगाली साहित्य आणि संगीत क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडून आले, इतकेच नव्हे तर साहित्याची 'रवींद्रपूर्व' आणि 'रवींद्रोत्तर' अशी विभागणी केली जाते, हीच त्यांच्या प्रभावाची प्रचिती आहे. टागोर हे केवळ कवी नव्हते, तर ते एक महान देशभक्त आणि समाजप्रबोधन करणारे विचारवंत होते. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात त्यांनी आपल्या लेखनातून जनतेमध्ये जागृती निर्माण केली आणि राष्ट्रीय अस्मितेला बळ दिले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी त्यांचे निधन झाले, मात्र त्यांची विचारसंपदा आजही जिवंत आहे. आधुनिक भारताच्या घडणीत त्यांच्या योगदानाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यांच्या काव्यातून आणि विचारातून मानवतेचा संदेश मिळतो, जो आजच्या काळात अधिकच आवश्यक आहे. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला आणि विचारांना विनम्र अभिवादन करताना, त्यांच्या मानवतावादी दृष्टिकोनातून प्रेरणा घेऊन समाज अधिक सुसंस्कृत, सर्जनशील आणि एकात्मतेने परिपूर्ण करण्याची गरज अधोरेखित होते.

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई–मेल : tahsildarsangamner@gmail.com
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/५३३/२०२६
संगमनेर, दिनांक – २४/०३/२०२६

### जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. रावसाहेब बाबुराव वर्पे, रा. कनोली, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक ०५/०३/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. कनोली, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे रावसाहेब बाबुराव वर्पे यांचा जन्म मौजे कनोली, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०२/०६/१९७६ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी कनोली यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी कनोली यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

# देवकवठेच्या जि. प. शाळेच्या चिमुकल्यांची सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये धमाल



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासाकरता सातत्याने विविध उपक्रम राबवणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने 'सांज चिमण पाखरांची' या कार्यक्रमांमधून देशाच्या विविध संस्कृतीचे दर्शन घडवले. बाल चिमुकल्यांनी सादर केलेल्या कलाविष्काराने मोठी धमाल केली असून सर्व नागरिक भारावले. जिल्हा परिषद शाळांमधूनच खऱ्या अर्थाने परिपूर्ण विद्यार्थी घडतो, असे प्रतिपादन आदर्श शिक्षक भाऊसाहेब गोरे यांनी केले.

जि. प. प्राथमिक शाळा देवकवठे येथे 'सांज चिमण पाखरांची' या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर राजहंस दूध संघाचे संचालक भारत मुंगसे, एकनाथ मुंगसे, चित्रपट दिग्दर्शक ॲड. बी. आर. गांडोळे, आय.ए.एस. उत्तीर्ण कुमारी ऋतुजा गायकवाड, विश्वनाथ खिलारी, नामदेव कहांडळ, राजेंद्र कहांडळ, ज्ञानेश्वर मुंगसे, राजेंद्र मुंगसे, शिवराज मुंगसे, कैलास सांगळे, सुनील गुडघे, सरपंच ज्योती मोकळ, भाऊसाहेब सांगळे, भाऊसाहेब कहांडळ, मुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी, प्रफुल्ल मुंगसे, राजू खरात, सुरेखा मुंगसे, तुकाराम कहांडळ, बाबासाहेब गाजरे, शत्रुघ्न मुंगसे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये 'संभाजी' या नाटिकेमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांचा घोड्यावरून झालेला प्रवेश, त्यांना झालेली अटक, भव्य दिव्य सेट आणि ४५ विद्यार्थ्यांच्या एकत्रितपणे सादर झालेल्या या कार्यक्रमाने सर्वांच्या अंगावर शहारे आणले. अहिराणी नृत्य, कोळी नृत्य, पंजाबी डान्स, यांसह विविध गीतांनी धमाल केली. वेशभूषा, सामूहिक नृत्य, भव्य स्टेज आणि दिमाखदार सादरीकरण यामुळे हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांचा 'छोटा बच्चा जानके' या १७ विद्यार्थ्यांच्या समूहाने सर्वांना खळखळून हसवले. यावेळी भाऊसाहेब गोरे म्हणाले की, देवकवठे गाव ही कलावंतांची भूमी आहे. प्रतिकूलतेतून अनुकूलता येथे निर्माण झाली आहे. जिल्हा परिषद शाळेमधून कायम परिपूर्ण विद्यार्थी घडला जातो. संघर्ष हा त्याला माहीत असतो आणि त्यामुळे तो जीवनात यशस्वी होतो. इंग्रजी आणि गणिताबरोबर विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण दिले जात असून नागरिकांनी जिल्हा परिषदेच्या शाळेतच आपले विद्यार्थी टाकले पाहिजे, असा आग्रह त्यांनी केला.

यावेळी सुधाकर मुंगसे, नामदेव शंकर, ज्ञानदेव कहांडळ, सोमनाथ सांगळे, राजाराम मुंगसे, शरद शेवंते, मच्छिंद्र आरोटे, अशोक गडाख, झुंबरबाई खतोडे, अभिमन्यू मुंगसे, सुनील मुंगसे, मच्छिंद्र सांगळे, ज्ञानेश्वर कुरकुटे, ऋषिकेश मुंगसे, शुभम मुंगसे, अशोक मुंगसे, सुभाष मुंगसे यांच्यासह विविध युवक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रफुल्ल मुंगसे यांनी केले, सूत्रसंचालन गणेश कहांडळ यांनी केले, तर भाऊसाहेब सांगळे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी देवकवठे सह पंचक्रोशीतील नागरिक, महिला व युवकांची मोठी उपस्थिती होती.

# अरविंद गाडेकर आणि आनंद गायकवाड यांचा सन्मान



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- व्यंगचित्रकार हा समाजातील उणीवांवर आपल्या कुंचल्यातून व्यक्त होत असतो. मात्र व्यक्त होताना समाजाचा समतोल बिघडणार नाही, हानी किंवा द्वेष पसरला जाणार नाही, यांची दक्षता व्यंगचित्रकारांनी घेतली पाहिजे. आजच्या धकाधकीच्या जीवनात हास्य महत्त्वाचे आहे. तणावमुक्त होण्यासाठी प्रत्येकाने एक तरी व्यंगचित्र रोज पाहिले पाहिजे, वाचले पाहिजे, असे मत प्रसिद्ध व्यंगचित्रकार अरविंद गाडेकर यांनी सत्काराला उत्तर देताना काढले आहे. कलाकार हा एका रात्रीतून तयार होत नाही, त्याच्यामागे असते कलेची साधना, जिद्द, चिकाटीने कला जोपासत तो यश संपादन करतो. मी चित्रकला शिकलो ते स्वतःवर असलेला आत्मविश्वास आणि सतत केलेले स्केचिंग, असे उदगार आनंद गायकवाड यांनी काढले.

आंतरराष्ट्रीय व्यंगचित्र महोत्सव पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे सुरू आहे. या महोत्सवात देश, विदेशातील व्यंगचित्रकारांनी सहभाग घेतला आहे. या महोत्सवात प्रसिद्ध व्यंगचित्रकार अरविंद गाडेकर यांनी काढलेल्या व्यंगचित्राची निवड झाली आहे. त्याबद्दल त्यांचा सत्कार शेख ईद्रीस, आसिफअली सय्यद आणि संगमनेर येथील नागरिकांनी केला आहे. व्यंगचित्रांचे प्रदर्शन ५ मे ते ९ मे पर्यंत सुरू आहे.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कार्यविभागांतर्गत पीएम व्हिजन टू आर्ट स्पर्धेत आनंद गायकवाड यांनी काढलेल्या 'बेटी बचाव, बेटी पढाव' या विषयावरील चित्राचा समावेश करण्यात आला. त्याबद्दल त्यांचा सांस्कृतिक कार्यमंत्री ॲडव्होकेट आशिष शेलार, सुलेखनकार पद्मश्री अच्युत पालव व व्यवस्थापकीय संचालक स्वाती हासे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. याबद्दल आनंद गायकवाड यांचा संगमनेर नगरीत सत्कार करण्यात आला.

यावेळी या सत्कार कार्यक्रमाचे आयोजक शेख ईदरीस, असिफअली सय्यद हे होते. या वेळी डॉ. जी. पी. शेख, डॉ. सुधाकर पेटकर, ज्ञानेश्वर गोंटे, मुकुंद डांगे, रमेशकाका सराफ, बाळकृष्ण महाजन, ज्ञानेश्वर राक्षे, लक्ष्मण ढोले, लहानू सदगीर, सुरेश परदेशी, राजेंद्र वेल्हाळ यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच या सत्कार कार्यक्रमास रि. ना. तहसिलदार अनिल सोमणी हे उपस्थित होते. ५ मे व्यंगचित्रकार दिन जगभर मोठ्या उत्साहाने साजरा होत आहे. यानिमित्त व्यंगचित्र प्रदर्शन, प्रात्यक्षिक आणि व्याख्यान आयोजित करण्यात येत आहेत.


**SUBSCRIBE YOUTUBE**

**Daily Yuvavarta**


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME RESHMABANU CHANDMIYA INAMDAR
TO NEW NAME AS RESHMA ANWAR SHAIKH
ADD – BAUDHDH MANDIR SAMOR, RAJWADA, SANGAMNER, TAL - SANGAMNER, DIST - AHILYANAGAR

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME A. RASHID. MAJID SHAIKH
TO NEW NAME AS RASHID MAJID SHAIKH
ADD – AT POST SAMNAPUR, TAL - SANGAMNER, DIST - AHILYANAGAR








**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**गाळे भाडेतत्वावर देणे आहे**
शोरुम, ऑफीस, बँक किंवा कमर्शिअल वापरासाठी दोन गाळे भाडे तत्वावर देणे आहे
ग्राऊंड फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट
फर्स्ट फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट
पत्ता – नाशिक–पुणे हायवे, डेंटल कॉलेज समोर, घुलेवाडी, ता. संगमनेर
संपर्क - 7755965616, 9422737484

**पाहिजेत**
वामनराव इथापे बी.एच.एम.एस. कॉलेजकरिता खालील पदे भरणे आहे
अकौंटंट – ०२ जागा, पात्रता – बी.कॉम/ एम. कॉम
कॉम्प्युटर ऑपरेटर – ०२ जागा, पात्रता – बी. कॉम
एल.एम. व्ही. वाहन चालक – ०३ जागा, अनुभवी
वॉचमन – ०३ जागा
पत्ता– डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड, संगमनेर
संपर्क - 9370071777, 9518556933, 9822791484

**ड्रायव्हर पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

**पाहिजेत**
Venkatesh
सरस्वती ॲग्रो इंडस्ट्रीज करीता अर्जंट भरती चालू आहे
- टेलीकॉलिंग – 10 जागा: फ्रेशर १० ते १२ हजार पगार व अनुभवास १३ ते १५ हजार (कुठलीही शाखेची पदवी उत्तीर्ण व महिलांना प्राधान्य)
- प्रोडक्शन लाइन – 10 जागा: पगार- ८ ते १० हजार (महिलांना प्राधान्य)
- Dispatch सुपरवाइझर – 02 जागा: (कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण महिलांना प्राधान्य )
- ड्रायवर - पगार- १५ हजार – 05 जागा: (ड्रायविंग लायसेंस व् अनुभव आवश्यक)

अर्जासह प्रत्यक्ष भेटा कॉल व भेटीची वेळ 10.00 ते 5.00
**सरस्वती ॲग्रो इंडस्ट्रीज**
संगमनेर औद्योगिक वसाहत, प्लॉट नं. 127 /A , संगमनेर, जि. अ.नगर
9699363221

**भाड्याने देणे आहे**
रुम भाड्याने देणे आहे
२०० स्के.फुट सर्व सुविधांयुक्त
पत्ता– शिवाजी नगर गल्ली, नं.१,संगमनेर
९४०४९१७९१२
९४०३१५४०१७

**पाहिजेत**
युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे
उपसंपादक - १
जाहिरात व्यवस्थापक - १
डिझायनर - १
वितरण व्यवस्थापक - १
टेलिकॉलर - १
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७९२७२,९३७०७७३५०४

**भाड्याने देणे आहे**
सुकेवाडी रोड टच असलेला संपूर्ण कलर केलेला
१२ X १२ फूट गाळा
भाड्याने देणे आहे
हा गाळा सलून, पार्लर, इस्त्री, टेलर, ऑफिस, नाश्ता पॉईंट किंवा गोडाऊनसाठी योग्य आहे
८२८२८२५८१८

**ड्रायव्हर पाहिजे**
गिअर आणि ऑटोमॅटिक कारसाठी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे
आकर्षक पगार
श्री गुलाब आर्च
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्युटर्स, विडोल ऑईल संगमनेर या फर्मसाठी
अकाउंटंट – १ जागा (बी. कॉम/ टॅली)– पुरुष
सेल्समन – १ जागा (वय वर्ष २२ ते ३२)
पगार – १४०००+ इन्सेंटिव्ह
शिक्षण – बारावी व त्यापुढील
8999862759

**पाहिजेत**
मसाज थेरपिस्ट १ जागा (पुरुष)
फिजिओथेरपिस्ट १ जागा (पुरुष)
रुग्णांचा काळजी घेणारे काका आणि मावशी
सप्तश्रृंगी हॉस्पिटल ॲण्ड पॅरालिसिस सेंटर, मुक्ताई मंदिराजवळ, रायते-वाघापूर, ता. संगमनेर, जि– अहिल्यानगर
9657230023

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

भंडारी
“शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी”
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# पश्चिम बंगाल आणि पोटनिवडणूक निकालाचा महायुतीकडून जल्लोष



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

पश्चिम बंगाल व आसाम विधानसभा निवडणुकांसह बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत भाजप व महायुतीला मिळालेल्या दणदणीत विजयाचा जल्लोष संगमनेर शहरात आमदार अमोल खताळ पाटील जनसंपर्क कार्यालयाच्या महायुतीच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष साजरा केला.

पश्चिम बंगालमध्ये अनेक वर्षांपासून सत्तेत असलेल्या तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांचा दारुण पराभव करत भाजपने सर्वाधिक जागा जिंकत दणदणीत विजय मिळवला. तसेच आसाममध्येही भाजपने सत्ता कायम राखत विजय संपादन केला. या विजयामुळे देशभरात भाजप कार्यकर्त्यांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. बारामतीचे आमदार व राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच राहुरी-पाथर्डी मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे या दोन्ही जागा रिक्त झाल्या होत्या. या दोन रिक्त जागांसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत बारामतीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुनेत्रा पवार यांनी विजय मिळवला, तर राहुरी पाथर्डी नगर मतदारसंघात महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले विजयी झाले.

या सर्व विजयांमुळे संगमनेरमध्ये महायुतीच्या कार्यकर्त्यांनी आमदार अमोल खताळ पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आनंद व्यक्त केला. महायुतीचा विजय असो, भाजपचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. यावेळी आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ, बंधू राहुल खताळ, शिवसेना शहर प्रमुख विनोद सूर्यवंशी, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, युवासेना उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख, तालुका प्रमुख सुशील शेवाळे, शहर प्रमुख सार्थक शेवाळे, भाजप शहर अध्यक्ष पायल ताजने, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष रोहित चौधरी, माजी नगरसेवक शिरीष मुळे, सुधाकर गुंजाळ, सिताराम मोहरिकर, श्याम कोळपकर, स्वप्निल बाहेती, वरद बागुल, राहुल गुळवे, प्रवीण दिड्डी, प्रवीण कर्पे, महेश मांडेकर यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संगमनेरमध्ये ‘साई मार्बल – आयकॉन टाईल द प्रायमा स्टोअर’चे भव्य उद्घाटन




संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

शहरातील बांधकाम व इंटेरियर क्षेत्रात नवे पर्व सुरू करत ‘साई मार्बल - आयकॉन टाईल द प्रायमा स्टोअर’चे भव्य उद्घाटन नुकतेच उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. भंडारी परिवाराच्या वतीने आयोजित या सोहळ्यास मान्यवरांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मालपाणी ग्रुपचे संचालक गिरीशजी मालपाणी, आयकॉन ग्रुपचे संचालक चिंटुजी सरोडिया तसेच आयकॉन ग्रुपचे ए.आर.एम. किशोरजी कडू उपस्थित होते. त्यांच्या हस्ते स्टोअरचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतात ‘साई मार्बल’च्या नव्या उपक्रमाचे कौतुक करत संगमनेरमध्ये दर्जेदार टाईल्स व मार्बलची उपलब्धता वाढणार असल्याचे सांगितले. आधुनिक डिझाईन्स, उत्कृष्ट गुणवत्ता आणि ग्राहकाभिमुख सेवा यामुळे हे स्टोअर ग्राहकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या उद्घाटन सोहळ्याचे आयोजन श्रीनिवास फुलचंद भंडारी, दर्शन मनोज भंडारी आणि हर्षित मनोज भंडारी यांनी केले होते. कार्यक्रमास उद्योजक गिरिष मालपाणी, उद्योजक राजेश मालपाणी, नगरसेविका रचना मालपाणी व्यापारी, बांधकाम व्यावसायिक, मित्रपरिवार तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

संगमनेरमधील मोतिनगर, कॉलेज रोड परिसरात सह्याद्री कॉलेजसमोर, कृष्णा टेक्सटाईल मार्केटच्या मागे हे नवे दालन सुरू करण्यात आले असून, येथे ग्राहकांना विविध प्रकारच्या अत्याधुनिक टाईल्स आणि मार्बलचे पर्याय उपलब्ध होणार आहेत. एकंदरच हा सोहळा उत्साहात आणि आनंददायी वातावरणात पार पडला.

# सहकार अधिकारी सदाशिव पारसे यांचे निधन

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

सहकार विभागातील विविध पदांवर आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे निवृत्त वरिष्ठ अधिकारी श्री. सदाशिव संभाजी पारसे (वय ८२) यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने सहकार आणि प्रशासन क्षेत्रातील एक अनुभवी मार्गदर्शक हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

सन १९४४ मध्ये जन्मलेल्या श्री. पारसे यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात महाराष्ट्राच्या विविध भागांत महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्या. यामध्ये १९६४-१९९० सोलापूर जिल्ह्यात तालुका उपनिबंधक म्हणून प्रदीर्घ काळ सेवा केली. संगमनेर येथे १९९१-१९९९ दरम्यान तालुका उपनिबंधक म्हणून कार्यरत असताना त्यांनी सहकार चळवळीला शिस्त लावण्याचे काम केले. तसेच उत्तर महाराष्ट्र विभागीय उपनिबंधक (दुग्धव्यवसाय) म्हणून त्यांनी दुग्ध व्यवसायाला चालना दिली. १९९९-२००० मध्ये सिंधुदुर्ग जिल्हा उपनिबंधक, तर २००१-२००२ मध्ये सोलापूर येथे प्रादेशिक उपआयुक्त, पश्चिम महाराष्ट्र हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग म्हणून सेवा बजावली. अशा उच्च पदावर काम करून प्रशासकीय कौशल्याचा परिचय दिला होता.



पारसे यांच्या पश्चात श्रीकृष्ण, गजानन, हरी हे तीन मुलगे, पाच मुली, सुना, जावई आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच सोलापूर, अहमदनगर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातून हळहळ व्यक्त करण्यात आली. त्यांच्या पार्थिवावर अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यविधी पार पडला. यावेळी राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. उपस्थित सर्वांनीच त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या निधनाने सहकार क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून, त्यांच्या कर्तृत्वाची आणि प्रामाणिक सेवाभावाची आठवण कायम राहील, अशा भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहेत. त्यांच्या कार्यातून अधिकाऱ्यांना प्रेरणा मिळाली आहे.

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL
Daily Yuvavarta
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

# मंत्री सावेंच्या ओएसडीकडून पत्नी व मुलाला अमानुष मारहाण

## विरोधी पक्षांकडून टिका, कारवाईची मागणी

मुंबई
(प्रतिनिधी)-

कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांचे विशेष कार्य अधिकारी (ओएसडी) विजय कारंडे यांनी आपल्या पत्नी व मुलाला अत्यंत भयंकर पद्धतीने मारहाण केल्याची घटना घडली आहे. या मारहाणीचे काही फोटो आज समोर आलेत. त्यात पत्नी व मुलाच्या अंगावर मारहाणीचे काळे-निळे व्रण दिसून येत आहेत. काँग्रेस व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने या प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठवत, मंत्र्यांच्या पंखाखाली बसून अशा गुंडांना अभय दिले जात आहे का, राज्याच्या गृहमंत्र्यांनी व मंत्री सावे यांनी यावर मौन का बाळगले आहे, असा सवाल केला आहे.



मंत्री अतुल सावे यांचे ओएसडी विजय कारंडे यांनी मोबाईलमधील संशयास्पद चॅटची विचारणा केल्याप्रकरणी आपल्या पत्नी व मुलाला मारहाण केल्याची बाब मंगळवारी समोर आली होती. यामुळे एकच खळबळ माजली होती. त्यानंतर आता या घटनेचे काही फोटो समोर आलेत. त्यात या दोघांनाही अत्यंत अमानुषपणे मारहाण झाल्याचे स्पष्ट होत आहे. यामुळे विजय कारंडे यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.

काँग्रेसने या प्रकरणी मुख्यमंत्री तथा राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्री अतुल सावे यांनी बाळगलेल्या मौनावर सवाल उपस्थित केला आहे. तसेच सावेंनी अद्याप या अधिकाऱ्याची हकालपट्टी का केली नाही, असा प्रश्नही उपस्थित केला आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार या प्रकरणी म्हणाले की, भाजपचे मंत्री अतुल सावे यांचा ओएसडी विजय कारंडे याने आपल्याच पत्नीचा गळा दाबून तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. मी मंत्र्याचा ओएसडी आहे, माझं कोणी काहीही बिघडवू शकत नाही, ही मस्ती येते कुठून, सत्तेच्या उबेत हे लोक इतके माजलेत की स्वतःच्या पोटच्या मुलालाही बॅटने फोडून काढताना त्यांचे हात थरथरले नाहीत.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता - श्री स्वामी समर्थ एजन्सी, स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क - 7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
डायलिसीस सुसज्ज ऑपरेशन थिएटर सीटी स्कॅन
सोनोग्राफी, २डी इको, एक्स रे अत्याधुनिक लॅब अत्याधुनिक आयसीयु
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25






दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264

RNI No. MAHMAR/2007/24252

पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25














# संगमनेरमध्ये भटक्या कुत्र्यांचा हैदोस

## अकोले नाका परिसरात नागरिक दहशतीत



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर (प्रतिनिधी) - शहरातील अकोले नाका परिसरात भटके कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात उपद्रव वाढला असून, अनेक नागरिकांना चावा घेतल्याच्या घटना समोर आल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांत कुत्र्यांच्या हल्ल्यांमुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच पादचारी विशेषतः धास्तावले आहेत. काही जणांवर सध्या उपचार सुरू असून, परिस्थिती गंभीर होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, अकोले नाका परिसरात भटके कुत्रे टोळक्याने फिरताना दिसत आहेत. हे कुत्रे अचानक पायी जाणाऱ्या नागरिकांवर तसेच दुचाकीस्वारांच्या मागे धावत हल्ला करतात. विशेषतः सकाळी आणि सायंकाळी या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांना बाहेर पडताना भीती वाटत आहे.

दरम्यान, काही महिन्यांपूर्वी नगरपालिकेने भटके कुत्रे आणि मोकाट जनावरे पकडण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली होती. मात्र ही मोहीम काही दिवसांतच अर्धवट थांबवण्यात आल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. परिणामी, शहरातील विविध भागांत पुन्हा एकदा भटक्या प्राण्यांची संख्या वाढल्याचे चित्र दिसत आहे.

या समस्येमुळे अपघातांचाही धोका वाढला आहे. कुत्रे अचानक रस्त्यावर धावत आल्याने दुचाकीस्वारांचा तोल जाऊन अपघात होण्याच्या घटना घडू शकतात, अशी भीती व्यक्त होत आहे. तसेच, कुत्र्यांच्या चाव्यामुळे रेबीजसारख्या आजारांचा धोका वाढत असल्याने आरोग्य विभागावरही ताण वाढण्याची शक्यता आहे. नागरिकांनी नगरपालिकेकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली असून, भटके कुत्रे पकडण्याची मोहीम पुन्हा प्रभावीपणे राबवावी, निर्बंधात्मक उपाययोजना कराव्यात आणि परिसरात लसीकरण मोहीमही हाती घ्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. याबाबत प्रशासनाने त्वरित पावले उचलली नाहीत, तर परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# जिल्ह्यातील पाणीप्रश्नावर मंत्री गुलाबराव पाटील यांच्यासमवेत आमदार सत्यजीत तांबेंची बैठक

## जलजीवन मिशन योजनेच्या कामांना वेग देण्याचे मंत्र्यांचे निर्देश



**पाणी हा मूलभूत प्रश्न आहे याकडे विलंब न करता गांभीर्याने लक्ष देणे गरजेचं आहे. पुढील काळात काळात जलजीवन मिशन अंतर्गत कामांना वेग मिळून ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळेल अशी अपेक्षा आ. तांबे यांनी व्यक्त केली.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -अहिल्यानगर जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांमध्ये येणाऱ्या अडचणींवर राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री मा. गुलाबराव पाटील यांच्यासमवेत आमदार सत्यजीत तांबे यांची बैठक पार पडली. यावेळी जिल्ह्यातील रखडलेल्या जलजीवन मिशन योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

अहिल्यानगर जिल्ह्यातील तसेच संगमनेर तालुक्यातील देखील विविध गावांमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनांना मंजुरी मिळूनही प्रत्यक्षात कामे पुढे सरकत नसल्याची वस्तुस्थिती आमदार तांबेंनी मांडली. अनेक ठिकाणी तांत्रिक अडचणी, प्रशासकीय विलंब आणि समन्वयाचा अभाव यामुळे नागरिकांना अजूनही शुद्ध पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागते.

याबाबत बोलतांना तांबे म्हणाले की, अहिल्यानगर जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांमध्ये येणाऱ्या अडचणींवर मी यापूर्वीच दि. ९ जुलै २०२५ रोजी पावसाळी अधिवेशनात सभागृहात आवाज उठवला होता. अनेक ठिकाणी पाईपलाईनचे काम रखडलं आहे, काही ठिकाणी तर वर्क ऑर्डर झाल्यानंतर ही प्रत्यक्ष काम सुरू झालेलं नाही. या विषयावर मी सातत्याने पाठपुरावा करतोय. बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील परिस्थिती वास्तववादी पद्धतीने मांडत पाणी हा मूलभूत प्रश्न आहे याकडे विलंब न करता गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे, अशी ठाम भूमिका घेतली आहे.

मंत्री गुलाबराव पाटील यांनीही याची दखल घेत अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सूचना दिल्या. योजनांच्या अंमलबजावणीत येणारे अडथळे तात्काळ दूर करा आणि कामांना गती द्या असे निर्देश देखील दिले आहेत. प्रत्येक योजनेची प्रगती नियमितपणे तपासली जाईल आणि कामात हलगर्जीपणा चालणार नाही असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्यासह पाणीपुरवठा विभागातील अधिकारी उपस्थित होते.

# अहिल्यानगर जिल्हा बँकेचे संचालक मंडळ बरखास्त; प्रशासकांकडे सूत्र




युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - नगरच्या जिल्हा सहकारी बँकेवर मंगळवार (दि.५) रोजी सायंकाळी उशिरा प्रशासक नियुक्तीचे आदेश सहकार खात्याच्या वतीने काढण्यात आले. त्यानंतर अवघ्या अर्ध्या तासात नियुक्त करण्यात आलेले प्रशासकांनी जिल्हा बँकेचा पदभार स्वीकारला. दरम्यान प्रशासक म्हणून जिल्हा विशेष लेखापरीक्षक गौतम निकाळजे यांची नियुक्ती झाली असून त्यांनी पदभार स्वीकारताच तातडीने आज बुधवार (दि.६) रोजी बँक प्रशासनाची बैठक बोलावली आहे.

जिल्हा बँकेच्या विद्यमान संचालक मंडळाची फेब्रुवारी २०२६ म्हणजे दोन महिन्यांपूर्वीच मुदत संपली होती. त्यानंतर सत्ताधारी दिवंगत अजित पवार गटाचे चंद्रशेखर घुले पाटील यांच्याकडे चेअरमन पद कायम होते. सहकार खात्याने राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगर जिल्ह्यातील सहकार विभागाच्या निवडणुका ३१ मे पर्यंत पुढे ढकलण्याचे आदेश दिले होते. यामुळे जिल्हा बँकेसह जिल्ह्यातील तीन सहकारी साखर कारखान्यांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या.

जिल्हा बँकेची निवडणूक पुढे ढकलल्याने बँकेवर प्रशासक म्हणून विद्यमान चेअरमन घुले यांच्याकडे पदभार कायम राहण्याची शक्यता व्यक्त होत होती. विद्यमान संचालक मंडळाची मुदत संपल्यानंतर गेल्या दोन महिन्यांपासून चेअरमन घुले पाटील हे बँकेचा गाडा हाकत होते. मात्र, मंगळवारी सायंकाळी अचानक विभागीय सहनिबधक संभाजी निकम यांनी जिल्हा बँकेवरील प्रशासक नियुक्तीचे आदेश काढले. नगरचे विशेष लेखा परीक्षक गौतम निकाळजे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निकाळजे यांनी मंगळवारी सायंकाळी साडेसहा वाजता प्रशासक पदाचा पदभार स्विकारला. त्यानंतर त्यांनी जिल्हा बँकेची बैठक बोलावली असून या बैठकीत ते बँकेच्या पूर्ण-अपूर्ण कामाचा प्राधान्यक्रम निश्चित करणार आहेत.

# पहिल्यांदाच डिजिटल पद्धतीने जनगणना

## नागरिकांना ऑनलाईन लिंकद्वारे स्व-जनगणनेची सुविधा उपलब्ध

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- देशात भारतीय जनगणना करण्यास सुरूवात झाली आहे.त्यादृष्टीने प्रगणक आणि पर्यवेक्षक यांना प्रशिक्षणे दिली जात आहे. मात्र यावेळी प्रथमच डिजीटल जनगणना केली जात आहे. त्याच बरोबर प्रत्येक नागरिक हा स्वतःच्या मोबाईलवर देखील स्वयं-जनगणना करू शकणार असल्याने अधिकाधिक नागरिकांनी स्व-जनगणना करावी असे आवाहन संगमनेर तालुका जनगणना अधिकारी तथा तहसिलदार धिरज मांजरे यांनी केले आहे.

संगमनेर तालुक्यात तीन टप्प्यात शिक्षकांना प्रशिक्षण दिले गेली आहे. दोन टप्पे पूर्ण झाली असून तिसऱ्या टप्यात हे प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू आहे. तालुक्यात साधारणपणे ६७२ प्रगणक,११२ पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी केली जाते आहे. तहसिलदार हे स्वतः चार्ज अधिकारी आहेत. त्याबरोबर जनगणना लिपीक धंनजय गायवळ व तंत्रज्ञान सहाय्यक गणेश सोनवणे असे स्वतंत्रपणे विभाग काम पाहतो आहे. त्यासाठी स्वतंत्र कक्ष सध्या कार्यरत आहे.

सध्या १ मे ते १५ मे रात्री बारा पर्यंत प्रत्येक नागरिक स्वतः आपल्या घराची व तत्सम माहितीची स्व-जनगणना करू शकणार आहे. त्यानंतर १६ मे ते १४ जून या कालावधीत प्रगणक निर्धारित करून देण्यात आलेली गावे आणि निश्चित विभागात घरोघरी जाऊन पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण करू शकणार आहेत. आरंभी घरांची गणना केली जाणार आहे. पुढील टप्पा हा फेब्रुवारी २०२७ ला सुरू होणार आहे.सध्या आपल्या तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांना देखील जनगणना कामासाठी नियुक्ती देण्यात आली आहे. त्याच बरोबर भविष्यातील परीस्थिती लक्षात घेऊन दहा टक्के अतिरिक्त कर्मचाऱ्यांनी देखील प्रशिक्षण देण्यात आले आहे. साधारण प्रत्येक प्रगणकाला १८० ते २०० कुटुंबाचे सर्वेक्षण करावे लागणार आहे. सर्वेक्षणाच्या दृष्टीने शासनाकडून नकाशे व आवश्यक ती माहिती पुरवण्यात येणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी आरंभीच्या स्वगणना कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.




ही आहेत प्रश्न- स्वगणना करण्यासाठी नागरिकांना गाव, कुटुंब प्रमुखाचे नाव, लिगं, घर, घराचे बांधकाम प्रकार, छत, स्वच्छतागृह, मोबाईल, रेडीओ, दूरदर्शन, आंतरजाल सुविधा, घरातील माणसांची संख्या,जात संवर्ग. घराची मालकी हक्क प्रकार, विवाहीत जोडप्यांची संख्या. पिण्याचे पाण्याचे स्त्रोत, पिण्याच्या पाण्याची सुविधा, प्रकाशाची सुविधा व स्त्रोत, वापरल्या जाणाऱ्या पाण्याचे व्यवस्थापन, घरात स्वयंपाकाला वापरल्या जाणाऱ्या गॅस सुविधा, अन्न कोठे शिजवतात. स्वयंपाकासाठी वापरले जाणारे इंधन, संगणक-लॅपटोप सुविधा, सायकल, मोटार सायकल, चार चाकी वाहन, मोबाईन नंबर आदी माहिती नोंदवावी लागणार आहे. नागरिकांनी संकेतस्थळावर नोंदवलेली माहिती पूर्णतः गोपनीय राखली जाणार असल्याने अधिकाधिक खरी माहिती नोंदवावी असे आवाहन करण्यात आले आहे.

स्व गणनेसाठी शासनाच्या वतीने लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी खालील लिंक वर क्लिक करून स्व जनगणना करता येईल. https://se.census.gov.in... तालुक्यात सर्वाधिक प्रगणक हे घुलेवाडी ग्रामपंचायतच्या कार्यक्षेत्रात कार्यरत राहणार आहेत. ५७ प्रगणक गुंजाळवाडी कार्यक्षेत्रात २२ प्रगणक, संगमनेर शहरांमध्ये १३५ प्रगणक कार्यरत राहणार आहेत.





